Internal circulation – Feb 1987
Shramik Mukti Dal, YUKRAND, CPI (ML)

द्वारा अजित सरदार १२१३/२ आपटे रोड, पुणे [illegible]१००४

स. न.

समाजामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रेरणेने आज अनेक पक्षबाह्य संघटना, गट व कार्यकर्ते क्रियाशील आहेत. या प्रत्येकाला आपापली स्वतंत्र ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. यांपैकी काही समाजवादी प्रवाहापासून, काही फुले-आंबेडकर यांच्या तत्त्वविचार व कार्यातून तर काही साम्यवादी तत्त्वज्ञानातून स्फूर्ती घेऊन काम करत आहेत. ज्या समाजघटकांत ते काम करत आहेत ते घटक आणि त्यांची कार्यक्षेत्रे यांच्यात विविधता आहे. साहजिकच त्या त्या भागातली परिस्थिती, तिथले प्रश्न आणि त्यानुरूप त्यांचे अग्रक्रम भिन्नभिन्न आहेत. मात्र सम्यक व आमूलाग्र परिवर्तनाची प्रेरणा हा त्यांच्यातला समान दुवा आहे.

कामगार, शेतकरी–शेतमजूर, आदिवासी, स्त्रिया, दलित, भटकेविमुक्त आदी विविध समाजघटकांचे समूह आपापल्या प्रश्नांवर स्वतंत्रपणे चळवळी उभारून ते सोडवून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांची एकसंध फळी उभारण्यात परिवर्तनवादी चळवळ कमी पडत आहे. याउलट समाजात हादरे देणाऱ्या ज्या चळवळी किंवा आंदोलने उभी रहात आहेत, त्यांच्या परिघाबाहेर आपण राहिलो आहोत. त्यांमध्ये प्रभावीपणे उतरून त्यांना दिशा देण्याचे काम आपण करू शकलेलो नाही.

अशा परिस्थितीत या सर्व घटकांसमोर व त्यांच्यात काम करणाऱ्या संघटनांसमोर अनेक आव्हाने व प्रश्न उभे रहात आहेत. परस्परांतील विश्वासाच्या आणि संवादाच्या अभावामुळे त्या प्रश्नांना संघटितपणे सामोरे जाण्यात अडचणी निर्माण होत आहेत. या अडचणींवर मात करून खऱ्या अर्थाने वैचारिक संवाद घडून यावा, मतैक्याच्या मुद्द्यांवर एकत्रित भूमिका घेऊन अधिक संघटित व परिणामकारक चळवळ उभी रहावी यासाठी परस्परांत अनौपचारिक पातळीवर चर्चा घडवून सामुदायिक मंथनातून आजच्या परिस्थितीला कवेत घेऊ शकणारी अशी व्यापक भूमिका निर्माण करण्याची गरज आहे. म्हणून एखादा कोणताही ठाम प्रस्ताव किंवा कार्यक्रम ठरवून न घेता खुल्या संवादातून भूमिका व कार्यक्रमापर्यंत पोचावे या हेतूने आम्ही आपली भेट घेऊ इच्छितो. त्यानंतर सर्वानुमते होणाऱ्या विचारानुसार पुढील पावले उचलावीत अशी आमची कल्पना आहे.

या प्रयत्नातील अडचणींची व मर्यादांची आम्हाला कल्पना आहे. पण कोणीतरी पुढाकार घेऊन या प्रक्रियेला गती देण्याची गरज आहे. सर्वांशी अशा प्रकारे बोलणी झाल्यावर एकत्रित विचारातून आपण पुढच्या वाटचालीची दिशा ठरवूया. या कामी आपले हार्दिक सहकार्य व खुला सहभाग मिळेल ही अपेक्षा.

खालील तारखांना आम्ही खालील ठिकाणी भेट देणार आहोत. आपल्याला कोणत्या दिवशी भेट घेणे सोयीस्कर आहे ते कृपया वरील पत्त्यावर कळवावे.

मुंबई – दि. १५, १६, १७ फेब्रु. '८७
औरंगाबाद – दि. २, ३, ४ मार्च '८७
धुळे – दि. ५, ६, ७ मार्च '८७.

आपले,
श्रमिक मुक्ती दल.   युवक क्रांती दल,   केंद्रीय पुनर्गठन समिती सी पी आय एम एल